शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्भूत शासकीय
मुद्रणालयात शिकाऊ उमेदवारांचे प्रशिक्षण
शिकाऊ उमेदवारांची पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : शिकाऊ २०१६/सीआर १८/उद्योग-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २२ जानेवारी, २०१६

वाचा :- १) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २७ मार्च, २०१५
२) संचालक,शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्रमांक आस्था/शिउमुवा/१४६४/कार्या-४अ-११/३७२, दिनांक ११/०९/२०१५

शासन निर्णय :-

शासकीय मुद्रण व लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर आणि शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद या मुद्रणालयातील अनुक्रमे २७, १६, ३१, २२ व २४ अशा एकूण १२० शिकाऊ उमेदवारांची अस्थायी पदे दिनांक ३१/०८/२०१५ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास उपरोक्त दिनांक २७/०३/२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. आता पुढील तक्त्यात मुद्रणालयनिहाय दर्शविल्याप्रमाणे एकूण १२० शिकाऊ उमेदवारांची अस्थायी पदे दिनांक १/९/२०१५ ते दिनांक ३१/८/२०१६ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीसाठी पुढे चालू ठेवण्यास या निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

१२० पदांचे संवर्गनिहाय विवरण

अ.क्र.	पदनाम	शा.म.मु. मुंबई	शा.फो.मु.व ग्रं. पुणे	शा.मु.व ग्रं. नागपूर	शा.मु.व ले.भां. कोल्हापूर	शा. मु. औरंगाबाद	
१	पुस्तक बंधक	१०	११	१४	१०	१४	५९
२	प्लेट मेकर	--	२	१	६	१	१०
३	डी.टी.पी.	८	--	४	--	२	१४
४	मशिन माईंडर	--	३	--	--	७	१०
५	लिथो ऑफसेट मशीन माईंडर	--	--	१२	६	--	१८
६	प्रतिरुप मुद्रण	७	--	--	--	--	७
७	प्रक्रिया	१	--	--	--	--	१
८	रिटचर	१	--	--	--	--	१
		२७	**१६**	**३१**	**२२**	**२४**	**१२०**

२. वरीलप्रमाणे शिकाऊ उमेदवारांच्या प्रचलित आदेशानुसार प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात यावा. तसेच, सदर पदे पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे किंवा कसे, याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

३. सदर १२० पदे उक्त कालावधीकरीता चालू ठेवण्यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक के-३, "२०५८-लेखन सामग्री व मुद्रण (००) (८००) इतर खर्च (०१) शिकाऊ उमेदवारांचे प्रशिक्षण" या मुख्य लेखाशिर्षाखालील संबंधित मुद्रणालयास सन २०१५-१६ व २०१६-१७ या वित्तीय वर्षातील मंजूर करण्यात आलेल्या/ मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १०/१६/व्यय-१६, दिनांक १२/०१/२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१२५५२४५७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaijnath
Bhujangrao Latake

Digitally signed by Vaijnath Bhujangrao Latake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8502d8fbaa5d3d31358e5bf349fc0853019893b61049b2ad260bccf75c596136, cn=Vaijnath Bhujangrao Latake
Date: 2016.01.22 12:55:39 +05'30'

(वै. भू. लटके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१) संचालक, शासकीय मुद्रण,लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/कोल्हापूर/औरंगाबाद
६) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, पुणे
७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
८) व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,पुणे
९) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर
१०) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर
११) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,औरंगाबाद
१२) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१६/वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई ३२
१३) कक्ष अधिकारी, प्रशासन-१, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) निवड नस्ती. (उद्योग-४).